MHAH220002902026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६५/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश**

[ दिनांक ०९.०३.२०२६]

**परसराम प्रभाकर बांगर वि. सरकार**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार परसराम प्रभाकर बांगर याने भारतीय नागरीक सुरक्षा कायदा २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार हा मौजे मतावळी, ता. आष्टी, जि. बीड येथील कायमचा रहिवासी आहे. त्याने महिंद्रा कंपनीचे बोलेरो मॅक्स पिकअप वाहन खरेदी केलेले असून सदर वाहनाचा नोंदणी क्र. MH-23-AU-6698, चॅसीस नंबर MA1RE2TTKR6M33837, इंजिन नंबर TTR4M24666 व रंग WHITE आहे. त्याच्या मालकीचे सदर वाहन पोलीस स्टेशन, मिरजगाव येथे गु.र.नं.६५/२०२६ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० चे कलम ११(१)(डी) अन्वये आणि महाराष्ट्र पशु संरक्षण कायदा १९७६ चे कलम ५(ए)(बी) चे उल्लंघनाबाबत कलम ९ अन्वये दाखल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. सदरकामी मिरजगाव पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी सदरचे वाहन जप्त करुन मिरजगाव पोलिस स्टेशन येथे ठेवलेले आहे. सदर वाहन पो.ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब होणार आहेत. सदर वाहन वापरात न राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणार आहे. सदर वाहन हे दैनंदिन वापरासाठी गरजेचे असून न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तो तयार आहे. सबब सदरील वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.६ लगत दाखल करुन सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्यास हरकत घेतलेली आहे. तपासी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदर गुन्हयातील पिकअप वाहन क्र.एम.एच.२३.ए.यु.६६९८ चा वापर कत्तलीच्या उद्देशाने गोवंश वाहतुक करण्याकरीता केलेला आहे. सदर वाहन मुळ मालकाच्या ताब्यात दिल्यास तो पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुन्हयातील वाहन हे मुळ मालकास दिल्यास त्यास कायद्याची भिती राहणार नाही. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले की, सदरचे वाहन अर्जदारास परत केल्यास पुन्हा तशाच प्रकारच्या गुन्ह्यात त्याचा वापर करु शकतो. तसेच सदरच्या वाहनाच्या मालकीत अगर बाह्य स्वरुपात बदल करु शकतो. तसेच सदरचे वाहन संपरिक्षेवेळी कोर्टासमोर उपलब्ध राहणार नाही. जप्त प्राण्यांबाबत त्यांचे योग्य पालनपोषण तसेच देखरेख, संरक्षणाबाबत योग्य तो आदेश व्हावा. सबब, सदर अर्ज नामंजुर करणेत यावा अशी हरकत घेतलेली आहे.

५. अर्जदाराने त्याच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ पोलिस स्टेशन, मिरजगाव येथे दाखल गु.र.नं.६५/२०२६ ची एफ.आय.आर. ची छायांकित प्रत (नि.क्र.३/१), सदर वाहनाची आर.सी.बुकची पडताळणी प्रत (नि.क्र.३/२), जप्त वाहनाच्या इन्शुरन्स पॉलीसीची छायांकित प्रत (नि.क्र.३/३) व अर्जदाराचे स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत (नि.क्र.३/४) ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

६. सदरील वाहन उपरोक्त गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तो जप्त वाहनाचा मालक आहे. सदर

कथनाचे पुष्ठ्यर्थ त्याने सदर गुन्ह्यातील वाहनाच्या आर.सी.बुकची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. त्यात नमूद वाहनाचे वर्णन अर्जदाराने अर्जात केलेल्या वर्णनाशी सुसंगत आहे. तसेच सदर वर्णनाचे वाहन पोलीसांनी गुन्ह्यात जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराने वादपटलावर दाखल केलेल्या नोंदणी पत्रातील मजकुरावरुन सदर वाहनाचा मालक अर्जदार स्वतः असल्याचे दिसते. सदरकामी अभियोक्ता व तपासी अधिकारी यांच्या जबाबावरुन त्यांनी अर्जदार सदर जप्त वाहनाचा मालक असल्याचे स्पष्ट नाकारलेले नाही. तसेच अर्जदाराच्या वतीने दाखल केलेल्या वाहनाच्या तपशीलाच्या प्रतीचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी अर्जदार हा सदर जप्त वाहनाचा मालक असल्याचे दिसून येते.

७. सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या युक्तीवादानुसार जप्त जनावरांची काळजी व निगा याबाबत योग्य त्या खर्चाचा आदेश होणे गरजेचे आहे. प्रस्तुत गुन्हयातील प्रथम खबरी अहवालाची प्रत आरोपीच्या वतीने दाखल करण्यात आलेली आहे. सदर खबरी अहवालाचे अवलोकन करता प्रस्तुत अर्जात वर्णन केलेल्या वर्णनाचे पिकअप वाहन क्र.एम.एच.२३.ए.यु.६६९८ या वाहनातून एक काळ्या रंगाची शिंगाची जर्सी गाय, एक काळे पांढरे रंगाची शिंगे नसलेली जर्सी गाय, एक तांबड्या पांढरे रंगाची शिंगे असलेली जर्सी गाय व एक पांढरे रंगाची तोंडास काळ्या रंगाचे जर्सी कालवड अशी एकूण चार जनावरांची वाहतूक होत असताना दिसून आली असा मजकुर नमुद आहे. तपासी अधिकारी यांनी देखील त्यांच्या जबाबात सदर वाहनात प्रथम खबरी अहवालात नमुद केल्याप्रमाणे गोवंश मिळून आल्याचे कथन केलेले आहे. सदर जप्त जनावरे पोलीसांनी तुकाई माता गोशाळा, बिटकेवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर गोशाळेकडे काळजी व निगेसाठी दिलेली आहेत.

८. अर्जदाराच्या विधिज्ञांनी केलेला सदर तोंडी युक्तीवाद विचारात घेतला. सकृतदर्शनी अर्जदार हा प्रस्तुत गुन्हयातील जप्त वाहनाचा मालक आहे व तपासी अधिकारी यास तपासाकामी सदर जप्त वाहनाची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या विधिज्ञांच्या युक्तीवादावरुन सदर जप्त जनावरे गोशाळेत ठेवण्यात आलेली आहेत. प्रस्तुत अर्जात अर्जदाराने केवळ जप्त वाहनाची मागणी केलेली आहे. सकृतदर्शनी अर्जदार सदर जप्त वाहनाचा मालक आहे. त्यांच्या युक्तीवादानुसार जनावरांची निगा व काळजी याबाबत देखभालीचा खर्च यासाठी वाहनाचा अंतरिम ताबा देतेवेळी आदेश करणे गरजेचे नाही.

९. उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. प्राण्यांचा छळ व निर्दयतेने वागणूक प्रतिबंध अधिनियमाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या नियमावलीतील नियम क्र.५ नुसार वाहनाचा मालक देखील जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चासाठी जबाबदार धरला जाऊ शकतो. त्यामुळे सद्य स्थितीत अर्जदार देखील सदर जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चासाठी अर्जदार जबाबदार धरला जाऊ शकतो. त्यामुळे जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चाबाबत प्रस्तुत अर्जावरील आदेशाच्यावेळी आदेश करणे गरजेचे नाही असा अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेला युक्तीवाद स्विकारण्यात येणार नाही.

१०. वरील विवेचनावरुन सकृतदर्शनी अर्जदार जप्त वाहनाचा मालक आहे. तसेच तपासाकामी तपासी अधिकारी यास सदर जप्त वाहनाची आवश्यकत नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत सदर जप्त जनावरांच्या काळजी व निगेसाठी झालेल्या खर्चाबाबत योग्य तो आदेश करुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य*** या न्याय निवाड्यातील निर्देशानुसार, तपासकामी सहकार्य करणे व वेळोवेळी सदरील वाहन पोलीसांच्या तपासात हजर करणे अशी अट घालून

सदर वाहन परत करण्यास कोणतीही बाधा नाही असे दिसते. त्यामुळे सदर जप्त वाहनाचा अंतरिम ताबा देते वेळी संबंधीत गोशाळेस जप्त जनावरांच्या निगा व देखभालीच्या खर्चापोटी नियमानुसार खर्च देण्याबाबत आदेश करणे देखील आवश्यक व गरजेचे आहे. तसेच अर्जदाराने जप्त वाहन अंतरिम आदेशानुसार त्याच्या ताब्यात देण्याइतपत कागदपत्रे न्यायालयात दाखल केली आहेत. वरील विवेचनाआधारे अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज योग्य त्या अटींवर मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार परसराम प्रभाकर बांगर यास पोलीस स्टेशन, मिरजगाव गु.र.नं. ६५/२०२६ चे गुन्हयातील जप्त वाहन महिंद्रा बोलेरो मॅक्स पिकअप वाहनाचा नोंदणी क्र. MH-23-AU-6698, चॅसीस नंबर MA1RE2TTKR6M33837, इंजिन नंबर TTR4M24666 व रंग WHITE या वाहनाचा अंतरीम ताबा पुढील अटींवर देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने रक्कम रू.३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख रु.फक्त) चे वाहन निरक्षणग्राही बंधपत्र द्यावे.

ब) अर्जदाराने मुळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर वाहनाच्या मुळ स्वरूप, रंग यात बदल करावयाचा नाही. तसेच सदर वाहन अन्य कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिल करावयाचे नाही.

क) अर्जदाराने सदर वाहनाचा वापर अर्जात नमूद प्रकारच्या गुन्हयांमध्ये करायचा नाही, तसेच न्यायालय अथवा तपासी अधिकारी निर्देश करतील त्याप्रमाणे हजर ठेवण्याचे आहे.

ड) अर्जदाराने प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त एक काळ्या रंगाची शिंगाची जर्सी गाय, एक काळे पांढरे रंगाची शिंगे नसलेली जर्सी गाय व एक तांबडे पांढरे रंगाची शिंगे असलेली जर्सी गाय अशा एकूण तीन गायींच्या निगा व देखभालीचा खर्च म्हणून संबंधीत गोशाळेस प्रत्येक गायी करीता प्रतिदिन रुपये २००/- व एक पांढरे रंगाची तोंडास काळ्या रंगाचे जर्सी कालवड याप्रमाणे सदर जप्त जनावरांचा ताबा दिल्याच्या तारखेपासून ते प्रस्तुत आदेशाचे दिनांकापर्यंत होणारी रक्कम द्यावी. अर्जदाराने तुकाई माता गोशाळा, बिटकेवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या गोशाळेकडे स्वतः जमा करावी व तशी रितसर पावती गोशाळेतील अधिकृत इसमांकडून घेऊन त्याची एक प्रत तपासी अधिकारी यांच्याकडे जमा करावी.

३. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी सदर वाहनाचा नोंदणीकृत नंबर, चेसीस नंबर व इंजीन नंबरचा दर्शनी भाग दिसावा असे फोटो काढून फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो बंधपत्रासोबत तपासी अंमलदार यांनी न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराने बंधपत्र तपासी अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करावे. अर्जदाराने तपासी अधिकारी यांना सहकार्य करावे.

५. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.03.09 17:34:21 +0530

कर्जत. (एस.एन.थापेकर)

ता.०९/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (कोर्ट क्र.१),कर्जत.